कावेरी यशवंत बागूल
वय - ३०, धंदा - नोकरी
पॅन. CAAPB8617E

कुनाल लक्ष्मण बहीराम
वय - ३०, धंदा - डॉक्टर
पॅन. CNHPB3222K **लिहून घेणार**
दोघे रा. मु. पो. दह्याने, ता. कळवण, नाशिक. ४२३५०१

**...यांसी...**

केतन प्रविनचंद्र त्रिवेदी
वय ५९, धंदा - व्यवसाय
पॅन. AAKPT2352E
रा. १९, ऋषिराज पार्क, गंगापुर रोड, **लिहून देणार**
मधुकमल नगर, नाशिक. ४२२०१३.

**कारणे ज्यादा सुख-सुविधा करारनामा लिहून देतो ऐसा जे कि,**

१ अ) मिळकतीचे वर्णनः- तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक, पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील रहिवासी विभागातील मौजे म्हसरुळ गांवचे शिवारातील बिनशेती मिळकत यांसी सर्वे क्र.१९७/१ते१०पी/१९८/१९९/१/१००पी/२०१/५/६ चे मंजूर लेआउट मधील प्लॉट नं. ५+६ यांसी एकूण क्षेत्रफळ २३०७.५७ चौ.मी. पैकी मोजमाप क्षेत्र २२७२.६२ चौ.मी. यांसी एकत्रित चतुः सिमा खालीलप्रमाणे :

पूर्व : ३० मीटर डि. पी. रोड
पश्चिम : प्लॉट नं. १२५ ते १२८
दक्षिण : प्लॉट नं. ०४
उत्तर : प्लॉट नं. २२७ व ०७

ब) वर कलम १ अ) मध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर मंजूर बांधकाम नकाशानुसार बांधकाम सुरु असलेल्या ऋषिराज गॅलक्सि या नावाने ओळखल्या जाणा-या इमारतीतील दुस-या मजल्यावरील रहिवासी फ्लॅट नं. सी २०४ यांसी चटई क्षेत्र ६१.४७ चौ. मी. व बाल्कनी क्षेत्र ११.४१ चौ.मी. सह यांसी चतुः सिमा मंजूर बिल्डिंग प्लान प्रमाणे.
येणेप्रमाणे फ्लॅट नं. सी-२०४ ची मिळकत रहिवासी उपयोगातील बांधीव फ्लॅट मिळकत. जाण्यायेण्याचे, वागवहिवाटीचे मालकी हक्कांसह, मोकळी जागा वापराचे सर्व सामायिक हक्कासहची मिळकत दरोबस्त.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही ऋषिराज रियल्टर्स यांचे खरेदी मालकीची मिळकत असून मिळकतीचे रेकॉर्डट ऑफ राईटला मालक म्हणून त्यांचे नावाची नोंद झालेली आहे. सदर मिळकतीवर ऋषिराज रियल्टर्स

यांनी ऋषिराज गॅलक्सि या नावाचे इमारतीचे बांधकाम सुरू केलेले आहे. सदर फ्लॅट नं. सी-२०४ ही मिळकत लिहून घेणार यांनी ऋषिराज रियल्टर्स यांचेकडून खरेदीघेणेचा व्यवहार केलेला आहे. त्याप्रमाणे ऋषिराज रियल्टर्स यांनी लिहून घेणार यांचे लाभात मे सह दुय्यम निबंधक, नाशिक - यांचे कार्यालयात सदर फ्लॅट मिळकतीचा करारनामा लिहून व नोंदवून दिलेला आहे.३) सदरील करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे ऋषिराज रियल्टर्स यांनी लिहून घेणार यांचे फ्लॅट मिळकतीस पुरवित असलेल्या सुविधांचे वर्णन नमूद केलेले आहे. सदरील सुविधांव्यतिरीक्त लिहून घेणार यांना अतिरीक्त व ज्यादा सुविधा आवश्यक आहेत. सदरील अतिरीक्त व ज्यादा सुविधा करून देणेकामी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना विनंती केली व सदरील अतिरीक्त व ज्यादा सुविधांकरीता स्वतंत्र किंमत देण्याचे मान्य व कबूल केले. त्यानुसार लिहून देणार व लिहून घेणार यांचे दरम्यान सदर बाबत साधक बाधक चर्चा होऊन लिहून देणार यांनी सदरील सुविधा देण्याचे मान्य व कबूल करून सदरील करारनामा लिहून घेणार यांचे लाभात लिहून दिलेला आहे.

४) सदरील कलम १ यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीमध्ये लिहून घेणार यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे ज्यादा सुविधांची मागणी केलेली आहे. सदरील मागणी केल्याप्रमाणे सदरहू सुविधांची सदनिकेच्या किंमतीव्यतिरीक्त किंमत खाली नमूद केल्याप्रमाणे कायम करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:

| **अ.क्र. तपशिल** | **चौ.फूट** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| १. सिरामिक डायमंड फ्लोअरिंग २.५ × २.५ | ५०० | ३७० | १,८५,०००/- |
| २. सदनिकेच्या किचन ओट्यावर ग्लेझ टाईल्स स्लॅबलेवल पर्यंत बसविणे. | २२० | १८२ | ४०,०००/- |
| ३. संडास आणि बाथरूम मध्ये ग्लेझ टाईल्स स्लॅबलेवल पर्यंत बसविणे. | २४८ | १८२ | ४५,०००/- |
| ४. ज्यादा पर्ल ब्लॅक ग्रेनाइटकिचन ओटा | २०६ | १७० | ३५,०००/- |
| ५. जिंदाल ३ ट्रॅक स्लायडींग विंडोज आणि मार्बल फ्रेम | २५० | २२० | ५५,०००/- |
| ६. गॅलरी साठी फ्रेंच डोअर | १६० | २५० | ४०,०००/- |
| **एकूण** | | | **४,००,०००/-** |

येणेप्रमाणे वर कलम १ यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीत लिहून घेणार यांनी मागणी केलेप्रमाणे वर नमूद केलेल्या सुविधा वरील दराप्रमाणे लिहून देणार यांनी पुरविण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

५) वर नमूद केल्याप्रमाणे तुम्हास पुरविण्यात येणाऱ्या जादा सुविधांची एकूण किंमत रक्कम रू. ४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख मात्र)

इतकी मात्र तुमचे व माझे दरम्यान कायम करण्यात आलेली आहे. सदरील किंमत आजचे बाजार भावाप्रमाणे योग्य व रास्त असल्याची खात्री करूनच तुम्ही माझेशी सदर बाबत व्यवहार कायम केलेला असून किंमतीचा भरणा तुम्ही मला पुढीलप्रमाणे अदा केलेला आहे व करावयाचा आहे.

**रक्कम रू.** **तपशिल**

४,००,०००/- अक्षरी रूपये चार लाख मात्र लिहून देणार यांना सदर फ्लॅट मिळकतीचा ताबा घेतेवेळी लिहून घेणार यांनी अदा करावयाचे आहेत.

**४,००,०००/-** **एकूण अक्षरी रूपये चार लाख मात्र.**

६) सदरहू मिळकतीमध्ये मी तुम्हास पुरवित असलेल्या जादा सुविधांची तुम्ही वेळोवेळी खात्री करून घ्यावयाची आहे. सदरहू सुविधा पुरविलेनंतर तुम्हास सदरहू सुविधांबाबत कोणताही वाद अथवा हरकत उपस्थित करता येणार नाही...

७) सदरहू करारनाम्यानुसार मिळकतीमध्ये लिहून देणार यांनी कामकाज केलेले असून तुम्हास व मला सदरील करारनामा रद्द करता येणार नाही.

८) सदरचा करारनामा लिहून देणार, लिहून घेणार यांचेवर व उभयतांचे वाली वारस यांचेवर देखील बंधनकारक आहे व राहील.

येणेप्रमाणे सदरचा करारनामा लिहून देणार यांनी राजीखुशीने स्वसंतोषाने, समजून उमजून, वाचून, ऐकून घेवून, कोणत्याही धाक, दडपणास बळी न पडता लिहून घेणार यांचे नावे लिहून दिला असून त्यावर खाली सह्या करणारे साक्षीदारांसमक्ष लिहून देणार व लिहून घेणार यांनी आपापली सही, अंगठा केलेला आहे. हा करारनामा. नाशिक.

____________________

कावेरी यशवंत बागूल

____________________

कुनाल लक्ष्मण बहीराम

**( लिहून घेणार )**

____________________

केतन प्रविनचंद्र त्रिवेदी

**( लिहून घेणार )**